
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 8 मे 2026 | अंक क्र. 346 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulyamaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# मदद करना जिसकी फितरत है, दुआएं उसके साथ चलती हैं !

## परळीत जे. के. कन्स्ट्रक्शनचा 'शाही' सामूहिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न










परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

आजच्या काळात लग्नकार्यातील भपका आणि अनावश्यक खर्चामुळे अनेक मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबे कर्जबाजारी होत असताना, परळीच्या भूमीत माणुसकीचे एक वेगळे दर्शन घडले आहे. बांधकाम क्षेत्रातील अग्रगण्य 'जे. के. कन्स्ट्रक्शन' समूहाने आपल्या व्यावसायिक यशासोबतच सामाजिक जबाबदारीचे भान राखत, गुरुवारी (७ मे) एका भव्य 'शाही' सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले. या सोहळ्याच्या माध्यमातून अनेक गरजू कुटुंबांना आर्थिक आधार देत त्यांचे स्वप्न साकार झाले आहे. राजकारण आणि समाजकारणात सक्रिय असलेल्या खान बंधूंच्या वतीने करण्यात आले होते.

जाफर खान व राजा खान यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक !
अनावश्यक खर्चाला फाटा देत खान
परिवाराने जपली सामाजिक बांधिलकी.

---

गरिबांच्या लेकींचे थाटात लग्न
"दिखावे की दुनिया में असल काम कर दिखाया,
बेसहारा दिलों को आपने खुशियों से मिलाया।"
"वही लोग दुनिया में अच्छे होते हैं,
जो वक्त पर इंसान के काम आते हैं।"

सामाजिक बांधिलकीचा 'शाही' आदर्श: बांधकाम क्षेत्रातील नामांकित 'जे. के. कन्स्ट्रक्शन' समूहाने केवळ व्यवसाय न करता सामाजिक जबाबदारी जपत एका भव्य सोहळ्याचे आयोजन होते.

### अनावश्यक खर्चाला फाटा

■ समाजात लग्नाकार्यात होणाऱ्या अफाट आणि अनावश्यक खर्चाला फाटा देऊन, साध्या पण भव्य पद्धतीने विवाह लावण्याचा एक नवा पायंडा खान बंधूंनी पाडला.

### भपका टाळला, आधार दिला!

■ लग्नासाठी जमीन विकणे किंवा व्याजाने पैसे काढणे यासारख्या विदारक परिस्थितीला अनेक बापांना सामोरे जावे लागते. हे चित्र बदलण्यासाठी जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान आणि परळीचे उपनगराध्यक्ष हाजी राजा खान यांनी पुढाकार घेतला. "समाजाचे आपण काही देणे लागतो आणि आपल्या आनंदात सर्वांना सहभागी करून घेता आले पाहिजे," या पवित्र भावनेतून हा 'शाही' विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

### नियोजन 'शाही', विचार 'प्रगत'

■ नावाला जरी 'सामुदायिक' सोहळा असला, तरी त्याचे आयोजन 'शाही' पद्धतीने करण्यात आले होते. प्रत्येक जोडप्याचा सन्मान आणि पाहुण्यांची सोय यात कोणतीही कसर खान परिवाराने सोडू दिली नाही. या उपक्रमात जाफर खान, हाजी राजा खान यांच्यासह उमर खान, एजाज खान, वाहेद खान, शाहेद खान आणि समस्त खान परिवाराने रात्रंदिवस मेहनत घेतली.



### अनावश्यक खर्चाला फाटादेत, गरीबांना मदतीचा हात

■ अनेक गरीब कुटुंबे लग्नासाठी कर्जबाजारी होतात किंवा अनावश्यक खर्चामुळे आर्थिक संकटात सापडतात. अशा कुटुंबांना आधार मिळावा आणि सामाजिक एकात्मता जोपासली जावी, या भावनेतून जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान आणि उपनगराध्यक्ष हाजी राजा खान यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. "समाजाचे आपण काही देणे लागतो, या भावनेतून आम्ही हा सोहळा आयोजित केला आहे," असे मत खान बंधूंनी व्यक्त केले.

■ या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी जाफर खान उस्मान खान, परळीचे उपनगराध्यक्ष हाजी राजा खान उस्मान खान, उमर खान, एजाज खान, वाहेद खान, शाहेद खान, जफर खान, नदीम खान आणि समस्त खान परिवाराने परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे जे. के. कन्स्ट्रक्शनची सामाजिक प्रतिमा अधिकच उंचावली असून, शहरात या कार्याची मोठी चर्चा आहे. राजकारण आणि समाजकारणापलीकडे जाऊन सर्वसामान्यांच्या हिताचा विचार केल्यामुळे जे. के. कन्स्ट्रक्शन आणि खान परिवाराचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## अनिशा ग्लोबल स्कूलच्या प्रगती जगदाळेची महाराष्ट्र राज्य सेपाक टकरा स्पर्धेत चमकदार कामगिरी

■ आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी शहरातील अनिशा ग्लोबल स्कूल येथील १४ वर्षाखालील गटातील खेळाडू कु. प्रगती गौतम जगदाळे हिने महाराष्ट्र राज्य सेपाक टकरा संघाकडून खेळताना उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

तेलंगणा येथे दि. २४ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या स्पर्धेत प्रगतीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. पहिल्या सामन्यात उत्तर प्रदेश संघाचा, दुसऱ्या सामन्यात गुजरात संघाचा तर तिसऱ्या सामन्यात पुन्हा उत्तर प्रदेश संघाचा पराभव करत तिने विजयाची सलामी कायम ठेवली. तिच्या दमदार खेळीमुळे महाराष्ट्र संघाला महत्त्वपूर्ण यश मिळाले. प्रगतीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असल्याची भावना क्रीडाप्रेमींमधून व्यक्त होत आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, तिला मिळालेल्या मार्गदर्शन व कठोर मेहनतीचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. कु. प्रगती जगदाळे हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, भविष्यात ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



संपादकीय

## मराठी बोलायची कोणी?

अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते.

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत-मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत!

निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन-चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे!

भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन - चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण-उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का?

मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी - शर्तींची, ना आंदोलनाची!

## “सरस्वती नदी वाचवा; काँक्रीटीकरण नव्हे तर पुनर्जीवन करा” : परळी नगरपरिषदेला निवेदन

■ परळी वैजनाथ :

धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या महत्त्व असलेल्या सरस्वती नदीच्या काँक्रीटीकरण प्रकल्पाविरोधात सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर यांनी परळी वैजनाथ नगरपरिषदेला सविस्तर निवेदन देत हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

नगरपरिषदेकडून दि. 30 एप्रिल 2026 रोजी देण्यात आलेल्या पत्राला उत्तर देताना मोगरकर यांनी म्हटले आहे की, सरस्वती नदी ही नैसर्गिक नदी असल्याचे तसेच ती पूर्वी बाराही महिने वाहत असल्याचे नगरपरिषदेकडून प्रथमच अधिकृतरीत्या मान्य करण्यात आले आहे. भूमी अभिलेख कार्यालयाकडे नदीची नैसर्गिक हद्द कायम करण्यासाठी मोजणीची मागणीही करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. निवेदनात नगरपरिषदेवर गंभीर आरोप करण्यात आले असून, नदीत थेट सांडपाणी व गटाराचे पाणी सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषण प्रतिबंधक कायद्यांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच नदीपात्रातील अतिक्रमण रोखण्यात नगरपरिषद अपयशी ठरल्याचे सांगत, सरस्वती नदीपात्रात उभारण्यात आलेल्या अर्धवट शॉपिंग कॉम्प्लेक्समुळे पूरस्थिती निर्माण होऊन नागरिकांचे नुकसान होत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. मोगरकर यांनी काँक्रीटीकरणामुळे भूजल पुनर्भरण थांबून जुन्या गावभागातील विहिरी, आड आणि बोअरवेलवरील पाणीसाठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. “नदीचे रुंदीकरण व खोलीकरण आवश्यक असले तरी पूर्ण सिमेंट काँक्रीटीकरण भविष्यातील जलसंकटाला आमंत्रण देणारे ठरेल,” असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. नगरपरिषदेकडून नदीतील पाण्याचा BOD आणि COD स्तर धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले असल्याने मागील पाच वर्षांतील तपासणी अहवाल सार्वजनिक करावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. परळी शहरात सुमारे 101 कोटी रुपयांची भूमिगत गटार योजना सुरू असताना, सर्व सांडपाणी STP प्रकल्पात प्रक्रिया होणार असल्यास नदी काँक्रीटीकरणाची आवश्यकता काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच प्रभू वैद्यनाथ मंदिरासाठी मंजूर झालेल्या तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सरस्वती नदीचे पुनर्जीवन व संवर्धन व्हावे, अशी परळीकरांची अपेक्षा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. “सरस्वती नदीतील काँक्रीटीकरणाचे काम लोकहिताचे नसून भविष्यात गंभीर पर्यावरणीय व जलसंकट निर्माण करू शकते. त्यामुळे हा प्रकल्प त्वरित रद्द करण्यात यावा, अन्यथा नागरिकांच्या तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल,” असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



## राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त श्री अरुणकुमार डोंगरे

**संभाजीनगरचे जिल्हाधिकारी व आमचे जिवलग मित्र श्री दिलीप स्वामी यांची अकोला येथे महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे प्रत्यक्ष अभिनंदन करून अमरावतीला परत आलो. रात्र बरीच झाली होती. मध्यरात्री वर्तमानपत्र व्हाट्सअप वर आलीत आणि ते वाचताना एक सुखद बातमी वाचण्यात आली. ती म्हणजे आमचे जिवलग मित्र श्री अरुण कुमार डोंगरे यांची अमरावती महसूल विभागाच्या राज्य हक्क सेवा आयोगाच्या आयुक्तपदी निवड झाली. खूपच आनंद झाला. इतक्या रात्री फोन करणे प्रशस्त वाटले नाही म्हणून साहेबांना संदेश टाकला. पण इतक्या रात्री देखील साहेबांनी तो संदेश पाहिला. हे कर्तव्यदक्ष अधिकारी कसा असतो त्याचे प्रत्यंतर त्यावेळेस आले.**



श्री अरुण कुमार डोंगरे यांचे अमरावती शहराचे जवळचे नाते आहे. या अमरावती विभागात ते विविध पदावर कार्यरत राहिले. एका अर्थाने ते अमरावतीकरच झाले. या मोठ्या कालावधीमध्ये अमरावती शहरांमध्ये त्यांचा भरपूर मित्रपरिवार तयार झाला. हसतमुख चेहरा तेजस्वी तत्पर व तपस्वी देहबोली यामुळे त्यांनी अल्प काळात लोकांची मने जिंकले. त्यांना जो माणूस भेटला तो त्यांनी आपलासा करून घेतला. त्यामुळे त्यांचा गोतावळा आज फार मोठा आहे.

एक आय ए एस ऑफिसर जेव्हा लोकांमध्ये मिसळतो लोकांमध्ये राहतो आणि त्यांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होतो तेव्हा खऱ्या अर्थाने प्रशासन लोकाभिमुख होते. डोंगरे साहेबांना ते कौशल्य साधले आहे. आणि म्हणूनच त्यांच्याकडे कुठलाही कार्यक्रम असो मुलीचा साक्षगंध असो ही मुलीचे लग्न असो किंवा इतर कार्यक्रम असो त्या कार्यक्रमाला त्यांचा महाराष्ट्रातील पूर्ण गोतावळा ताकतीनिशी उभा राहतो.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर युग निर्माता नावाचे नाटक बसविले होते. 1998 चा तो काळ. डॉ. पंजाबराव देशमुख यांची जन्मशताब्दी होती. मी त्या समितीचा सचिव होतो.अमरावतीला श्री ह रा कुलकर्णी हे आयुक्त होते. ते आमच्या पाठीशी समर्थपणे उभे राहिले. श्री अरुण डोंगरे साहेब तेव्हा दारव्हयाला उपविभागीय अधिकारी होते .ते म्हणाले एक कार्यक्रम आमच्या दारव्ह्याला पण ठेवा. त्यांच्या सूचनेप्रमाणे आम्ही दारह्याला युग निर्माता नाटकाचा प्रयोग केला आणि तो अतिशय चांगल्या रीतीने संपन्न झाला. विशेष म्हणजे साहेब प्रयोगाला तर थांबलेच. परंतु आमची सर्वांची जेवणे होईपर्यंत व आमची बस अमरावतीला रवाना होईपर्यंत हे आमच्याबरोबर होते. सर्व कलावंतांनी त्यांच्या या आपुलकीची नोंद घेतली.

साहेब नांदेडला जिल्हाधिकारी असताना आम्ही साहेबांना भेटायला गेलो. अर्थातच माझी नांदेडची मित्रमंडळी म्हणाली आम्ही पण भेटायला येतो तुमच्या निमित्ताने जिल्हाधिकारी साहेबांची आमची भेट होईल. मी साहेबांना आम्ही सात-आठ लोक येणार आहोत अशी कल्पना दिली. सायंकाळी आम्ही साहेबांच्या बंगल्यावर पोहोचलो. साहेबांनी व वहिनीसाहेबांनी आमचे उत्स्फूर्त स्वागत केले. आणि आम्हाला इतके खाऊ पिऊ घातले की घरी येऊन जेवण करण्याची आवश्यकता भासली नाही. विशेष म्हणजे साहेब आम्हाला त्यांच्या बंगल्याच्या फाटकापर्यंत सोडायला आले. आमचे मित्र पाहताच राहिले. एक जिल्हाधिकारी माणूस इतके आदरतिथ्य करू शकतो हे मित्राच्या दैनंदिनीत प्रथमच घडत होते. मला मात्र ते नेहमीचेच होते. सौ वहिनी साहेबांनी देखील सर्वांना आग्रह करून सर्व पदार्थ खाऊ घातले .

साहेब सोलापूरला असताना माझा मी आय ए एस अधिकारी होणारच कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमानंतर जेवण झाल्यानंतर साहेब म्हणाले तुम्ही आराम केल्यापेक्षा माझ्याबरोबर चला. तुमच्या मिसेसला पण सोबत घ्या. माझे एक आयएएस मित्र आहेत मल्लिनाथ कलशेट्टी. त्यांनी त्यांच्या आईच्या सन्मानार्थ एक कार्यक्रम त्यांच्या गावला ठेवलेला आहे. तुम्ही आईवर प्रेम करता म्हणून तुम्ही त्या कार्यक्रमाला येणे गरजेचे आहे. मी व सौ विद्या साहेबांबरोबर त्या कार्यक्रमाला गेलो. कार्यक्रमाला बरेच वरिष्ठ आयएस अधिकारी आले होते त्यामध्ये माझे मित्र श्री वीरेश प्रभू या आयपीएस अधिकाऱ्यांचाही समावेश होता. कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही निघायची घाई करू लागलो. कारण की अमरावतीला परत जायचे होते .साहेब म्हणाले तुम्ही सायंकाळचे जेवण करूनच मुक्काम करूनच उद्या सकाळी जा. रात्रीचा प्रवास करू नका. सौ. वहिनींनी आमचे मनापासून आदरतिथ्य केले व दुसऱ्या दिवशी आम्ही सकाळी प्रस्थान केले .पण सौ वहिनींनी आम्हाला अमरावती पर्यंत पुरेल एवढे खाद्यपदार्थ व फळ फळावळ आमच्या गाडीत कर्मचाऱ्याकरवी भरून दिले. आणि आम्हाला सूचना दिली की रस्त्यात काही खाऊ नका. तुम्हाला रोज भाषणे द्यावे लागतात. तुमची प्रकृती बिघडू नये म्हणून मी अमरावतीपर्यंत पुरेल एवढे खाद्यपदार्थ व फळाफळावळ तुमच्या गाडीमध्ये दिले आहेत. केवढी ही माया. अशा आपुलकीमुळेच डोंगरे परिवाराने लोकांना जिंकले आहे.

साहेब अमरावतीला महसूल विभागामध्ये अमरावती विभागाचे महसूल उपायुक्त असताना कांतानगर येथील शासकीय बंगल्यात राहत होते. दुपारी बारा एक वाजता मी त्यांच्याकडे गेलो. तर ते व त्यांचे जिवलग मित्र श्री दिलीप स्वामी हे डायनिंग टेबलवर बसले होते. सणाचा दिवस होता. मी आल्याचे कळताच कळताच त्यांनी मला सरळ डायनिंग टेबलवर बोलाविले. पुरणपोळीच्या बेत होता. आणि त्यांनी आग्रह करू करू सुग्रास भोजन दिले. वहिनी आणि साहेब स्वतः लक्ष देऊन मला आग्रह करीत होत्या. इतकी ही प्रेमळ माणसे.

आम्ही अमरावतीच्या श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनमध्ये एक कार्यक्रम घेतला होता . साहेब तेव्हा अमरावती महानगरपालिकेमध्ये आयुक्त होते. आमच्या कार्यक्रम चार वाजता होता. साहेब प्रमुख पाहुणे होते. माझे कार्यक्रम तंतोतंत वेळेवर सुरू होतात हे साहेबांना माहीत होते. नेमके चार वाजता साहेबांना महत्त्वाचे काम निघाले. ते स्थगित करण्यासारखे नव्हते. साहेबांनी त्यांचे जिवलग मित्र व तेव्हाचे अमरावतीचे राजपत्रित अधिकारी श्री दिलीप स्वामी यांना फोन केला. काठोळे सरांचा कार्यक्रम आहे. मला महत्त्वाचे काम निघाले आहे. तुम्ही आठवणीने बरोबर चार वाजता कार्यक्रमाला जा. आणि माझे प्रतिनिधित्व करा. किती ही आपुलकी. मला जमणार नाही असे ते सांगू शकले असते. पण आपण गेलो नाही तर काठोळे सरांची गैरसोय होईल म्हणून त्यांनी पर्यायी व्यवस्था करून दिली होती. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे व तो आजही कायम आहे.

साहेबांच्या मुलीचे लग्न ठरले. सुरुवातीला साक्षगंध. तर काही दिवसानंतर लग्न. दोन्ही वेळेस साहेबांनी प्रत्यक्ष मला फोन करून तुम्ही आलेच पाहिजे असा आग्रह धरला. एक सनदी अधिकारी माझ्यासारख्या एका सामाजिक कार्यकर्त्याला फोन करतो साक्षगंधाला या विवाहाला या असा आग्रह धरतो हे क्वचित घडते. पण डोंगरे साहेबांना ती किमया साधली आहे. साहेबांच्या मुलीच्या साक्षगंधाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी हे आवर्जून उपस्थित होते. साहेबांच्या मुलीच्या लग्नाला तर मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस हे 45 मिनिट लग्न समारंभ स्थळी आवर्जून उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री एखाद्या विवाह समारंभाला 45 मिनिटे देतो यावरून साहेबांचे व त्यांचे किती घनिष्ठ संबंध आहेत हे लक्षात येते. साहेबांनी अशी नाती जपली आहेत आणि म्हणूनच त्यांचे मित्र देखील त्यांना जपण्याचा प्रयत्न करतात हे वेगळे सांगणे न लगे.

साहेबांचा अमरावतीचा ऋणानुबंध प्रशासनाने देखील लक्षात घेतला आणि म्हणून ते सेवानिवृत्त झाल्यानंतर देखील त्यांना अमरावती विभागाची महसूल विभागाची महत्त्वाची जागा असलेली राज्यसेवा हक्क आयोग या शासकीय यंत्रणेचे आयुक्त म्हणून नियुक्ती देऊन त्यांच्या प्रशासकीय कामाचा एक प्रकारे गौरवच केलेला आहे. आपल्या सुस्वभावामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळणाऱ्या त्यांना आपलेसे करणारे हे ज्येष्ठ सनदी अधिकारी अमरावती विभागात लवकरच रुजू होत आहेत. अर्थातच अमरावती विभागामध्ये त्यांचे सर्वांकडून प्रचंड स्वागत होईल यात दुमत नाही.



■ प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे
संचालक मिशन आयएएस
अमरावती कॅम्प 9890967003


## मुलींसाठी “संत भगवानबाबा कृपा (एसबीके) वसतिगृह” पुण्यात सुरू

## वंजारी समाजातील मुलींसाठी ५० टक्के जागा राखीव

■ पुणे : वृत्तसंस्था

उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या निमित्ताने पुण्यात येणाऱ्या मुलींसाठी सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अभ्यासाला पूरक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नांदेड सिटी, पुणे येथे “संत भगवानबाबा कृपा (एसबीके) वसतिगृह” सुरू करण्यात येत आहे. हे वसतिगृह १ जुलैपासून विद्यार्थिनींसाठी खुले होणार आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी, यूपीएससी-एमपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या मुली तसेच नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हे वसतिगृह उपयुक्त ठरणार आहे. आधुनिक सुविधा, सुरक्षित वातावरण आणि अभ्यासासाठी आवश्यक सोयी यामुळे विद्यार्थिनींना चांगले वातावरण मिळणार आहे. वसतिगृहामध्ये प्रशस्त व स्वच्छ खोल्या, वाय-फाय सुविधा, सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था, स्वतंत्र वाचन कक्ष, भोजन व्यवस्था तसेच वाहन पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला आणि शिस्तीला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या वसतिगृहात वंजारी समाजातील मुलींसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या असून उर्वरित जागा इतर समाजातील विद्यार्थिनींसाठी उपलब्ध राहणार आहेत. त्यामुळे सर्व समाजातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी पुण्यात सुरक्षित निवासाची सुविधा मिळणार आहे.




प्रवेशासाठी मर्यादित जागा उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थिनींनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रिया १५ जूनपर्यंत सुरू राहणार असून त्यानंतर रिक्त जागांसाठी गुणवत्ता यादीच्या आधारे प्रवेश देण्यात येणार आहेत. वसतिगृहाच्या संचालिका डॉ. सुवर्णा भारत कऱ्हाड असून विद्यार्थिनींना सुरक्षित, सुसंस्कृत आणि अभ्यासकेंद्रित वातावरण उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

■ **अधिक माहितीसाठी संपर्क : ८६२६०६१३५१.**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# राष्ट्रीय सैनिक संस्थेच्या विदर्भ सचिव पदी प्रशांत गावंडे यांची नियुक्ती

**महागाव | प्रतिनिधी**

राष्ट्रीय सैनिक संस्था महाराष्ट्र राज्य मुख्यालय, यवतमाळ येथे आयोजित बैठकीमध्ये राष्ट्रीय सैनिक संस्थेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हरीश्चंद्र बद्रीनाथ राठोड यांनी विदर्भ उपाध्यक्ष व सचिवाची यांची नियुक्ती केली.

त्यामध्ये राष्ट्रीय सैनिक संस्था विदर्भ सचिव पदी पुसद येथील प्रशांत गावंडे यांची निवड करण्यात आली.

प्रशांत गावंडे यांचे सामाजिक कार्य खूप मोठे आहे, स्व.जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटी या सेवाभावी संस्थेचे प्रशांत गावंडे संस्थापक अध्यक्ष असून या सामाजिक संस्थेमार्फत सामाजिक पर्यावरणवादी शैक्षणिक कार्य निरंतर सुरूच असते. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक शिबिर घेणे, सुशिक्षित बेरोजगारांना मार्गदर्शन, शेती विषयी कार्यशाळा, शेतकऱ्यांचा सन्मान वाढवण्यासाठी त्यांच्या बैलजोडीला उत्कृष्ट पारितोषिक देऊन सन्मान ,तंबाखूमुक्त शाळा अभियान राबवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, पाणीबचत कार्यशाळा ,वृक्षरोपण, कामगारांचा सत्कार, आरोग्यविषयक शिबिर ,उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्त्याचा सत्कार, रक्तदान शिबिर, शैक्षणिक सामाजिक पर्यावरणवादी विविध उपक्रम ,त्यांनी जिल्हाभर पॉलिथिन मुक्तीची मोहीम राबवून एक नवीन आदर्श निर्माण केला. उमरखेड तालुक्यातील कोर्टा या गावी महापूरांचा प्रलय आला होता तेव्हा प्रशांत गावंडे यांचे मोलाचे योगदान असून सांगली कोल्हापुर येथे सुद्धा महापुराच्या वेळेस त्यांनी सात दिवसाचा कॅम्प आपल्या सहकार्यासोबत महापुराने







उध्वस्त झालेल्या गावांमध्ये ठेवला होता,ते एक स्वतः फार्मासिस्ट असून फार्मासिस्ट च्या हिताचे त्यांचे योगदान मोलाचे असते स्थानिक संघटनना त्यांचा बहुमान केला, त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्रातील मोजक्याच फार्मासिस्ट मध्ये त्यांना फार्मा गौरव पुरस्कार तात्कालीन एफडीआयचे आयुक्त महेश झगडे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर अमरावती विभागातून उत्कृष्ट फार्मासिस्ट म्हणून त्यांना नुकताच मोठा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल कडून देण्यात आला.

ग्रामीण भागातल्या मुलांना स्पर्धा परीक्षेचे ज्ञान अवगत व्हावे या दृष्टीकोनातून महागाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील तीन ते साडेतीन हजार विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञान स्पर्धा घेऊन एक नवीन आदर्श निर्माण केला ,त्यामुळे मुलांच्या बौद्धिक विकासामध्ये भरभराट झाली असून जिल्हा परिषद शाळेविषयी त्यांची नेहमीच सकारात्मक भूमिका पाहायला भेटते, विविध जिल्हा परिषद शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य ट्रॉफी सन्मानपत्र जिल्हा परिषद मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांना देत असतात.

प्रशांत गावंडे यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना विदर्भाच्या सचिव पदावर महत्त्वाच्या मदर कार्यकारणीत महत्त्वाचे स्थान दिले,यावेळी नवनियुक्त पदाधिकारी तसेच उपस्थित सर्व सदस्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हरीश्चंद्र राठोड यांनी सांगितले की, “राष्ट्रीय सैनिक संस्था ही सैनिक, शहीद सैनिकांचे माता-पिता, वीरपत्नी तसेच राष्ट्रसेवेसाठी कार्य करणाऱ्या नागरिकांच्या सन्मानासाठी कार्यरत असलेली राष्ट्रीय संघटना आहे. या माध्यमातून देशभक्त नागरिक व माजी सैनिकांसोबत राष्ट्रसेवेचे कार्य करण्याची संधी मिळते.”

नियुक्तीनंतर आम्ही युवकांसाठी कार्य करू व जास्तीत जास्त युवकांना राष्ट्रसेवेत सहभागी करु असे नवनियुक्त सचिव प्रशांत गावंडे यांनी सांगितले

बैठकीस TDRF सहा. संचालक सौ. रुपाली हरीश्चंद्र राठोड, राष्ट्रीय सैनिक संस्था विदर्भ जनसंपर्क अधिकारी जगदीश जांगीड, अमरावती विभागीय अध्यक्ष अभिषेक राजहंस, विभागीय सचिव मुस्कान सैय्यद, विभागीय जनसंपर्क अधिकारी सुनील महल्ले, तसेच शाहीद सैय्यद, विक्की धुळे, संजीवनी पवार, श्रीकांत पांचाळ इतर सदस्य उपस्थित होते.

# अंबाजोगाईच्या डॉ .कमलाकर राऊत यांचे राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत यश

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

येथील श्री योगेश्वरी नूतन विद्यालय माध्यमिक विभागातील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक, साहित्यिक, वक्ते, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार डॉ.कमलाकर कोंडिबा राऊत यांनी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रभाषा पंडित पदवी परीक्षेत यशस्विता प्राप्त केली आहे.

डॉ.राऊत यांनी सुरूवातीला आय.टी.आय.फिटरच्या आधारे धूत कॉम्पॅक व बजाज कंपनीत कामगार म्हणून कार्य केले. एच.एस.सी., डी.एड. या शैक्षणिक अर्हतेवर १९९७ साली त्यांनी सेवेला प्रारंभ करताच पुढे बहि:स्थ सलग शिक्षण घेऊन एम.ए., एम.एड.,नेट, पीएच.डी., डी.एस.एम., एन.डी - २, एल.टी.सी, साहित्यभूषण, राष्ट्रभाषा प्रवीण ही शैक्षणिक अर्हता धारण केली. नुकतीच त्यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.), नवी दिल्ली यांच्या वतीने शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेच्या (सी.टी.ई.टी.) दोन्ही परीक्षेत यशस्विता प्राप्त केली आहे. डॉ.राऊत यांची ३ पुस्तके, संपादित पुस्तके, विशेषांक, स्मरणिका, ४३



शोधनिबंध आणि ५०० पेक्षा अधिक लेख, कविता, कथा आजपावेतो प्रकाशित झाल्या आहेत. डॉ.राऊत यांना लेखनासाठी याआधी विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरांवरील पारितोषिके आणि विविध क्षेत्रांतील कर्तृत्वासाठी पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या वतीने डॉ.राऊत यांना ५ सप्टेंबर २०१७ रोजी शिक्षक दिनी शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, संशोधन या क्षेत्रांतील कार्यकर्तृत्वासाठी, राष्ट्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रभाषा पंडित परीक्षेतील सदरील यशाबाबत डॉ.राऊत यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, मी श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाचा विद्यार्थी असून याच विद्यालयात अध्यापन करीत आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटत आला आहे. शिक्षकाची भूमिका ही स्वाभाविक, चैतन्यशील आणि चैतन्यदायी असून दैनंदिन परिणामकारक व स्फूर्तीदायी अध्यापनासाठी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पदव्याचा, प्राप्त शिक्षणाचा खूप उपयोग होत आला आहे. सदरील यशस्वितेसाठी डॉ.कमलाकर राऊत यांचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, सर्व सन्माननीय संचालक, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती ए.आर.पाठक, उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, पर्यवेक्षक रवी मठपती, बंधू विष्णू राऊत, सहकारी शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# आष्टी–कडा रोडवर भररस्त्यात सोनसाखळी चोरी ; दुचाकीस्वार चोरट्यांनी पाच तोळ्यांचे मंगळसूत्र लंपास केले

**आष्टी (प्रतिनिधी):**

आष्टी शहरात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून, बुधवारी रात्री आष्टी-कडा रोडवर कुबोर्डा ट्रॅक्टर शोरूमसमोर एका महिलेच्या गळ्यातील पाच तोळ्यांचे सोन्याचे मनिमंगळसूत्र दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी जबरदस्तीने ओढून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

,फिर्यादी सौ. सुवर्णा शरद वांढरे (वय ४४, रा. मुर्शदपूर, आष्टी) या ६ मे २०२६ रोजी रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास आपल्या मैत्रिणीसह (राधीणी गणेश पिसाळ) स्कूटीवरून (क्र. MH 23 AH 5557) एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी जात होत्या. गणपती चौकाच्या पुढे, कुबोटा ट्रॅक्टर शोरूमसमोरून जात असताना पाठीमागून 'शाइन' दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्याशी बरोबरी साधली. काही समजण्याच्या आत, दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने सुवर्णा यांच्या गळ्यातील सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीचे पाच



तोळ्यांचे मनिमंगळसूत्र जोरात ओढले आणि अंधाराचा फायदा घेत कडा रोडच्या दिशेने पळ काढला.

भररस्त्यात घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेनंतर सुवर्णा वांढरे यांनी तातडीने आष्टी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून परिसरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही (CCTV) कॅमेऱ्यांच्या मदतीने चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# पर्यावरणास हाणी पोंहचवणारा सरस्वती नदीवरील सिमेंटीकरणाचा प्रस्ताव रद्द करा–सौ .वर्षाताई जोशी



**परळी (प्रतिनिधी)**

परळी शहरातुन वाहत असलेल्या सरस्वती नदीचे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या धार्मिक इतिहासात मोठे महत्व असुन या नदीच्या अस्तित्वामुळेच परळीला पाण्यावरची परळी अशी ओळख आहे.परळी नगरपालिकेने या नदीचे क्रॉंक्रिटीकरण करुन अस्तित्वच संपवण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. यामुळे धार्मिक ठेवा तर नष्ट होणारच आहे परंतु पर्यावरणाची मोठी हाणी होणार असल्याने हा प्रकल्प रद्द करुन पर्यावरणपूरक प्रकल्प राबवावा अशी मागणी भाजपा शहर उपाध्यक्षा सौ.वर्षाताई जोशी यांनी केली आहे.

याबाबत नगरपालिका मुख्याधिकारी यांना निवेदन देत सरस्वती नदीवरील प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे.परळी वैजनाथ शहरातुन वाहत असलेल्या सरस्वती नदीमुळे शहराचा पर्यावरणीय समतोल राखण्यास मोठी मदत होते.या नदीच्या पाण्यामुळे पाणीपातळीसह,तापमानात समतोल राखला जातो.या नदीच्या पाण्यामुळे अंबेवेस, गणेशपार,बरकत नगर,कृष्णा नगर,शिवनगर,इंदिरा नगर,पद्मावती गल्ली,आझाद नगर अशा अर्ध्या परळी शहराची पाणीपातळी अवलंबुन आहे. परळी नगरपालिका सध्या सरस्वती नदीवर शासनाचा प्रोजेक्ट राबवण्याच्या तयारीत असुन यामध्ये दोन्ही बाजुंनी भिंती व तळाला क्रॉंक्रीट केले जाणार असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या पाणी अडवा पाणी जिरवा या मोहिमेला छेद बसण्याबरोबरच पवित्र सरस्वती नदीचे नैसर्गिक अस्तित्व नष्ट होणार आहे. आपण महाराष्ट्रात इतर ठिकाणच्या नद्यांचे सुशोभिकरण करुन पर्यावरणाचा समतोल राखला जात असताना सरस्वती नदीचे मात्र सिमेंटीकरण करण्यात येत आहे. पवित्र सरस्वती नदीवर पर्यावरणपुरक असा सुशोभिकरणाचा प्रोजेक्ट राबवावा ही विनंती.सरस्वती नदीपात्रातील अतिक्रमण हटवुन नदीचे पात्र मोकळे करत काही ठिकाणी घाट,वॉकिंग ट्रॅक,झाडे-हिरवळ लावुन सुशोभिकरण झाले तर ही परळी शहरातील नागरीक आणि बाहेरगावहुन येणार्या वैद्यनाथ भक्तांसाठी मोठी उपलब्धी असेल.तरी आपण या जनभावनेचा विचार करुन सध्याचा सिमेंट कॉंक्रीटीकरणाचा प्रस्ताव रद्द करुन पर्यावरणपूरक प्रस्ताव राबवावा अन्यथा आम्ही सर्व वैद्यनाथभक्त आंदोलन करणार असल्याचा इशारा सौ.वर्षाताई जोशी यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रति

पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे,माजी मंत्री आ.धनंजय मुंडे,जिल्हाधिकारी बीड,उपविभागिय अधिकारी परळी वैजनाथ यांना देण्यात आल्या आहेत.

# आष्टीच्या महात्मा फुले चौकात फळ विक्रेत्यांच्या अतिक्रमणामुळे वाहतूक ठप्प

## नगरपंचायतीच्या निष्क्रियतेवर प्रश्न




**आष्टी | प्रतिनिधी**

नगरपंचायतीने आ. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात दर्जेदार सिमेंट रस्ते बांधले आहेत. रस्त्यांची रचना आणि दर्जा उत्तम असूनही महात्मा फुले चौकात थेट रस्त्यावरच दोन्ही बाजूंनी फळ विक्रेते बसल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. हा चौक आष्टीचा मध्यबिंदू असून येथूनच शहराच्या विविध भागांत आणि बाहेरगावी जाणारी वाहतूक सुरू असते. मात्र, सध्या याच चौकात रस्त्यावर फळांचे गाडे, टोपल्या आणि पेट्या मांडून व्यवसाय केला जात आहे. त्यामुळे दुचाकी, रिक्षा, चारचाकी आणि पादचारी यांना मार्ग काढणे अशक्य झाले आहे. सकाळी आणि संध्याकाळी बाजाराच्या वेळेत येथे वाहनांच्या रांगा लागतात आणि शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना गर्दीतून जीव मुठीत धरून वाट काढावी लागते. बाहेरून आष्टीत येणाऱ्या नागरिकांचा पहिलाच अनुभव वाहतूक कोंडीचा येत असल्याने शहराच्या प्रतिमेलाही धक्का बसत आहे.

या अतिक्रमणामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून विक्रेत्यांना रस्ता मोकळा करण्याची विनंती करूनही ते दाद देत नाहीत. उलट वाद घालून नागरिकांनाच अडवले जाते. काही वेळा नागरिकांचा संयम सुटून शिवीगाळीपर्यंत प्रकरण जाते. आ. सुरेश धस यांनी चांगले रस्ते दिले असतानाही नगरपंचायत अतिक्रमण हटवू शकत नाही, याची खंत स्थानिक व्यापारी व्यक्त करत आहेत. नगरपंचायतीने रस्ते बांधण्यासाठी मोठा निधी खर्च केला असला तरी अतिक्रमण हटवण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा उभी केलेली नाही. वारंवार तक्रारी होऊनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही, त्यामुळे नगरपंचायतीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांची मागणी आहे की, विक्रेत्यांसाठी बाजारात स्वतंत्र जागा निश्चित करून त्यांना तेथे हलवावे. महात्मा फुले चौक मुख्य वाहतुकीचा मार्ग असल्याने येथे रस्त्यावर व्यवसायास मुभा देता येणार नाही. नगरपंचायतीने तातडीने अतिक्रमण हटवून वाहतूक पूर्ववत करावी, अशी अपेक्षा आष्टीकर व्यक्त करत आहेत.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, शुक्रवार, 8 मे 2026



## परळीतील गर्भवती महिला हेळसांड प्रकरणाची जिल्हा शल्यचिकित्सकांकडून गंभीर दखल; चौकशीसाठी तज्ञ वैद्यकीय समिती नियुक्त

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी शहरातील गित्ते हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात गर्भवती महिलेच्या उपचारादरम्यान हलगर्जीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या गंभीर प्रकरणाची जिल्हा शल्यचिकित्सकांनी तातडीने दखल घेतली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर जिल्हा शल्यचिकित्सक बीड डॉ. सतिशकुमार साळुंके यांनी हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याचे निरीक्षण नोंदवत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

तक्रारदार वैजनाथ संभाजी मुंडे यांनी डॉ.कल्पना सचिन गित्ते या डॉक्टरांवर उपचारात निष्काळजीपणा, वेळेवर योग्य वैद्यकीय निर्णय न घेणे, मृत भ्रूण तब्बल २२ तास मातेच्या पोटात ठेवणे तसेच आर्थिक शोषण केल्याचे गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांमुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सका डॉ.सतिशकुमार साळुंके यांनी तातडीने चार सदस्यीय वैद्यकीय चौकशी समिती नियुक्त केली आहे. संबंधित रुग्णालयातील उपचार प्रक्रिया, वैद्यकीय नोंदी, डॉक्टरांची भूमिका, उपचारातील विलंब तसेच रुग्णाच्या प्रकृतीशी संबंधित सर्व बाबींची सखोल तपासणी समितीकडून केली जाणार आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतिशकुमार साळुंके यांनी स्पष्ट केले आहे की, हे प्रकरण अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. या प्रकरणी अतिशय गांभीर्यपूर्वक व वस्तुनिष्ठ चौकशी तातडीने करण्यात येईल. चौकशी अहवाल प्राप्त होताच दोषी आढळणाऱ्यांविरोधात नियमानुसार कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. रुग्णांच्या जीवाशी कोणत्याही परिस्थितीत खेळ सहन केला जाणार नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या घटनेमुळे परळी शहरासह परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित कुटुंबाला न्याय मिळावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. पोलीस प्रशासना कडूनही या प्रकरणाचा समांतर तपास सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण यांनी दिली आहे.

## श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन ; शनिवारी शोभायात्रा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

येथील शनिमंदिर देवस्थान ट्रस्ट च्यावतीने श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन रविवार (दि.१०) ते शनिवार (दि.१६) करण्यात आले आहे. तर शनिवारी सायंकाळी सहा वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

येथे श्री वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनैश्वर मंदिरात दरवर्षी शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर व सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या प्रेरणेने अखंड शिवनाम सप्ताह, श्री.ग्रंथराज परमरस्य पारायण सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी अखंड शिवनाम सप्ताहाची सुरुवात रविवारी (दि.१०) ते शनिवार (दि.१६) पर्यंत करण्यात आले आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित




करण्यात आले आहेत. शनिवारी (दि.१६) संध्याकाळी ७ वाजून ०४ मिनिटांनी शनैश्वर जन्मोत्सव साजरा होईल, यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी प्रमाणे महाप्रसाद शनिमंदिर मध्ये होणार आहे. त्याचबरोबर शनिवारी (दि.०९) सायंकाळी ५ वाजता शोभायात्रा हनुमान मंदिर मोंढा येथून राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक मार्गे शनी मंदिरात काढण्यात येणार आहे. तसेच गुरुवारी (दि.१४) भव्य रक्तदान शिबीर सकाळी आठ ते अकरा यावेळेत आयोजित केले आहे. धार्मिक कार्यक्रमात रोज सकाळी शिवपाठ, परमरस्य पारायण, शनि महात्म्य पारायण, गाथा भजन, प्रवचन आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सर्व कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके व श्री. शनिमंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रिन्स प्रशांत गावंडे यांची भारत सरकार च्या जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा घाटंजी येथे निवड

**महागाव :** शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाची समजणारी जाणारी भारत सरकार जवाहर नवोदय विद्यालय शैक्षणिक सत्र 2026 27 घेतलेल्या परीक्षेत उटी येथील प्रशांत गावंडे यांचे सुपुत्र चिरंजीव प्रिन्स प्रशांत गावंडे यांची निवड झाली आहे,

या परीक्षेत जिल्ह्यातील 16 तालुक्यातील विद्यार्थी हजारांच्या संख्येने परीक्षेला बसतात त्यामध्ये 80 विद्यार्थी पात्र ठरले असून त्यामध्ये जेट किड्स



इंटरनॅशनल स्कूल पुसद चा विद्यार्थी प्रिन्स प्रशांत गावंडे याने उत्कृष्ट गुण प्राप्त करून आपला या विद्यालयामध्ये प्रवेश निश्चित केला आहे, त्याच्या यशाबद्दल सगळीकडे कौतुक होत असून आपल्या यशासाठी आई प्राप्ती प्रशांत गावंडे वडील प्रशांत गावंडे, ज्ञानदीप अकॅडमी संचालक कौस्तुभ धुमाळे, शिक्षिका अश्विनी वाडीकर मॅडम यांना जाते. भविष्यात अशा विविध स्पर्धा परीक्षा देऊन मोठ यश संपादन करायचे असे मनोगत प्रिन्स गावंडे यांनी मांडले.

## मातोश्री विद्यालयाची सानिका अविनाश राऊत एच एस सी परीक्षेत महागाव तालुक्यात प्रथम



शैक्षणिक सत्र 2025 26 फेब्रुवारी मार्च मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षेत सानिका अविनाश राऊत हिने 92.67%गुण मिळवून तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला.सानिकाने आपले शिक्षण पूर्व प्राथमिक पासून इयत्ता बारावी पर्यंत कोणत्याही प्रकारचे शिकवणी वर्ग न लावता मातोश्री विद्यालयातून पूर्ण केले आहे तिने आपल्या अभ्यासाचे नियोजन व शिक्षकांचे मार्गदर्शन अभ्यासात चिकाटी जिद्द ठेवून सदर परीक्षेत यश संपादन केले आहे ती आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य व शिक्षक वृंद व पालक यांना देते विद्यालयाच्या वतीने पालकासमवेत सत्कार करून तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## एस .टी .आरक्षणासाठी नेमलेल्या समितीने पाच महिन्यात केलेल्या कामाचा आढावा द्या

### परळी तालुका गोर सेनेची राज्यसरकार कडे मागणी



**परळी | तालुका प्रतिनिधी -**

गेल्या वर्षी गोरबंजारा समाजाला एस.टी.प्रवर्गातून आरक्षण द्या,हैदराबाद गॅझेट लागू करा आदी मागण्यासाठी गोरबंजारा समाजाने महाराष्ट्रभर ५५ महामोर्चे काढले शिवाय गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृध्दी महामार्गावर हजारो गोर सनिक उतरवून रास्ता रोको केला व नांदेड रेल्वे रोखण्याचा इशारा दिला होता मात्र राज्यसरकार न सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व बंजारा समाजातील शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा झाली व एसटी आरक्षणासाठी उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीन कोणती कामे केली, कोणत्या दिशेने अभ्यास सुरु केला आहे की अजून फक्त कागदापुरतीच समिती सिमित राहिली आहे हे कळत नसल्याने गोरबंजारा समाज आक्रमक झाला असून अभ्यास समितीने पाच महिन्यातील केलेली कामे गोरबंजारा समाजापुढे मांडावीत या मागणीसाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज राज्यभर ३०० पेक्षा अधिक जागेवर निवेदन देण्यात आले आहे.

संपूर्ण भारतातील १४ करोड गोरबंजारा समाजाची जन्मापासून तर मरेपर्यंत स्वतंत्र गोरधाटी असून आदीम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात देशातील अनेक राज्यात त्यांना यामुळेच एस.टी.प्रवर्गातून आरक्षण दिलेले आहे मात्र महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती अ प्रवर्गात सामावेश केलेला आहे.मात्र गोरबंजारा समाजाचे राहणीमान वागणूक, रुढी परंपर,विशिष्ट ठिकाणी तांडा करुन राहणे,गोरबोली, गोरधाटी, पेहराव,आर्थिक मागासलेपण,स्वभावातील लाजबुजरेपणा हे आदिम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात म्हणून त्यांना एसटी प्रवर्गाचा समांतर आरक्षण द्यावे ही गेल्या ७५ वर्षापासूनची मागणी आहे गेल्यावर्षी याच मागणीसाठी राज्यात ५५ पेक्षा अधिक लाखोच्या संख्येने महामोर्चे निघालेत.पाच युवकांनी आपले जिवन संपवून शहीद झालेत.अनेकांनी आमरण उपोषण केले, रास्ता रोको केले.मात्र सरकारने दखल घेतली नाही म्हणून गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृध्दी महामार्गावर हजारो गोर सैनिक उतरवून रास्ता रोखला तेव्हा सरकारने सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी बंजारा शिष्टमंडळासोबत चर्चा केली व अभ्यास समिती उच्च न्यायालयाचे न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीने नेमके कशाचा अभ्यास केला, कोणत्या दिशेने केला, याबाबत समाजाला आजपर्यंत काहीच माहिती दिलेली नाही तेव्हा ही समिती केवळ कागदापुरतीच सिमित तर नाही ना अशी शंका गोरबंजारा समाजात निर्माण झाली असून अभ्यास समितीने आजपर्यंत नेमके काय काय केले हे समजून घेण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना गोरसेनेचे तालुकाध्यक्ष मा. विनोदभाऊ राठोड गोरसेनेचे कार्यकर्ते

प्रेम चव्हाण,रमेश चव्हाण सर, बाळू राठोड, संतोष जाधव, विशाल चव्हाण , सचिन पवार, मोहन पवार , दत्तात्र्य राठोड, संतोष राठोड, युवराज राठोड उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे मुरुड येथे आगमन

### आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिवादन




**लातूर | प्रतिनिधी**

अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे मुरुड येथे आगमन झाले असून या निमित्ताने पुतळ्याची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली प्रारंभी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. सदरील पुतळ्याचे लवकरच भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकार्पण करण्यात येणार आहे.

लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पूर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी अनेक वर्षापासून मुरुडकरांनी प्रयत्न केले मोठ्या प्रतिक्षेनंतर लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून नाशिक येथील कारागरांनी तयार केलेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अत्यंत आकर्षक आणि भव्य पूर्णकृती पुतळा नुकताच मुरुड नगरीत दाखल झाला. सदरील पुतळ्याची छत्रपती शिवाजी महाराज चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. लवकरच भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून या पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे.

मिरवणुकीच्या प्रारंभी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बसविण्यात येणार्या पुतळ्याच्या जागेची त्यांनी पाहणी करुन सुचना केल्या. यावेळी पु. भिकू पय्यानंद, भाजपाचे किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, भाजपा मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, भाजपाचे शहराध्यक्ष महेश कणसे, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, सतीश आंबेकर, विश्वास कावळे, दीपक वांगसकर, सौ. लताताई भोसले, सुरज सूर्यवंशी, नागराज बचाटे, शुभम देवकर, रवी इटकर, दत्ता पुदाले, वैजनाथ हराळे, रवी माकोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा कमिटीचे अध्यक्ष महेश सुरवसे, उपाध्यक्ष भालचंद्र धावारे, सचिव गौतम लांडगे, धनराज शिंदे, योगीराज साखरे, बाबा भिसे, शुभम खोसे यांच्यासह मुरुड येथील सर्व समाजातील नागरिक तरुण भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.